**रयत शिक्षण संस्थेचे,**

# चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२२-२३

**कार्यक्रम अधिकारी : प्रा. डॉ. श्रीमती एस. जे. माने**

**प्रा. डॉ. आय. एच. मुल्ला**

- **शिबिर ठिकाण : दत्तक गाव मौजे तळंदगे**
- **कालावधी : दि. ०७/०१/२०२३ ते दि. १३/०१/२०२३**
- **सहभागी स्वयंसेवक : १०० (मुले : ५५, मुली : ४५)**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम सत्रात राष्ट्रीय सेवा योजना विभाग मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत झाला. या विभागात एकूण २ युनिट (२०० स्वयंसेवक) आहेत. यातील एक युनिट (१०० स्वयंसेवक) हे विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी निवडले जाते. या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरातून स्वयंसेवकांना समाजामध्ये राहून नेमक्या गाव पातळीवरील समस्या, जबाबदाऱ्या काय आहेत याची जाणीव होऊन त्यादृष्टीने त्यांचे व्यक्तित्व विकसित करणे आणि श्रमदानातून, बौध्दिक व्याख्यानातून तसेच वेगवेगळया उपक्रमातून स्वत:चा तसेच समाजाचा आत्मविश्वास विकसित करण्यासाठी व विकास करण्यासाठी प्रयत्न या श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून केला जातो.

यास अनुसरुन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या दत्तक घेतलेल्या मौजे तळंदगे येथील गावात दि.०७/०१/२०२३ ते दि. १३/०१/२०२३ या कालावधीत विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. या शिबीरातील घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमांचा अहवाल पुढीलप्रमाणे :-

- **शनिवार दि. ०७ जानेवारी २०२३** : रोजी उद्‌घाटन संमारंभाचे आयोजन करण्यात आले होते. उद्‌घाटक म्हणून मान.डॉ.अलोक जत्राटकर (जनसंपर्क अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मान. श्री. संदीप पोळ (सरपंच, ग्रामपंचायत, तळंदगे) यांनी भूषविले. यावेळी नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अगोदर स्वयंसेवकांनी निवासी ठिकाणी तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणची स्वच्छता, पाणी व्यवस्था केली.
- **रविवार दि. ०८ जानेवारी २०२३** : रोजी जगन्नाथ मंदिर परिसर तसेच मंदिर परिसरातील असणाऱ्या झाडांच्या भोवतीने आळी व स्वच्छतेची कामे केली. व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात मा. श्री. बाळासाहेब पुजारी (संस्थापक, जानकी वृध्दाश्रम, घोसरवाड) यांनी "प्रगत समाज आणि वृध्दाश्रम" या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. श्री. किरण पांडूरंग कोळी यांनी भूषविले. यावेळी श्री. राजेंद्र हवालदार, मा. श्री. नुरमहंमद अत्तार आणि श्री. विवेकानंद शिंगाडे हे प्रमुख उपस्थित होते. व्याख्यानानंतर सायंकाळी स्वयंसेवकांनी म.फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, गाडगे महाराज,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषा करून बाकी सर्व स्वयंसेवकांनी "मतदार राजा जागा हो " या विषयावर मतदार जनजागृती फेरी संपूर्ण तळंदगे परिसरात काढून मतदार जनजागृती विषयी घोषणा देण्यात आल्या. यास ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला.

- **सोमवार दि. ०९ जानेवारी २०२३** : तळंदगे येथील गावच्या प्रवेशद्वारापासून रस्ता, गटार स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. त्याचबरोबर गावातील बिरोबा मंदिर परिसर, प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांची संपूर्ण स्वच्छता यावेळी करण्यात आली. प्रबोधनपर व्याख्यान मालेत मा. श्री. पंडित चोपडे (भादोले) यांचे "राष्ट्रीय सेवा योजना आणि आजचा युवक " या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. माणिक शिवाजी शिणगारे हे होते. तर मा. सौ. शुभांगी सचिन कांबळे, मा. श्री. कमलाकर आनंद पालके हे प्रमुख उपस्थित होते. व्याख्यानानंतर रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर यांच्या सहकार्याने 'अवयव दान श्रेष्ठदान' या महत्त्वाच्या विषयावर ग्रामपंचायत कार्यालय परिसरातील चौकामध्ये लघुपट सादरीकरण करण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी, ग्रामस्थांनी याचा लाभ घेतला.
- **मंगळवार दि. १० जानेवारी २०२३** : मौजे तळंदगे येथील प्रसिध्द असणाऱ्या जगन्नाथ मंदिर येथील असणाऱ्या झाडांची आळी करण्याचे काम तसेच तलाव स्वच्छतेचे काम स्वयंसेवकांनी केले. दुपारी १२.०० वाजता मा. सौ. अमृता कुंभार, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, तळंदगे यांच्या संयुक्त विद्यमाने 'मुली व महिला आरोग्य शिबीराचे' आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वांना कॅल्शियमच्या गोळ्या वाटप करण्यात आले. प्रबोधनात्म कार्यक्रमात सायंकाळी मा. श्री. विशाल चिगरे (नटराज डान्स ॲकॅडमी, मांगूर-इचलकरंजी) यांचे 'जीवन सुंदर आहे' याविषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. श्री. कुमार कोळी यांनी भूषविले तर मा. श्री. दिपक सलगर, मा. सौ. वर्षा भोजकर हे प्रमुख उपस्थित होते. यानंतर गटचर्चा घेण्यात आली. गटचर्चेचा विषय हा "मोबाईल आवश्यक की अनावश्यक" असा होता.
- **बुधवार दि. ११ जानेवारी २०२३** : रोजी प्राथमिक मराठी शाळेच्या पलिकडे असणाऱ्या मैदानाची, गावाबाहेर असणाऱ्या स्मशानभूमीची तसेच गावात असणाऱ्या कब्रस्थानची स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात मा. श्री. कृष्णात स्वाती (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र, अंनिस) यांचे "अंधश्रध्दा निर्मुलन : काळाची गरज" या विषयावर संवादात्मक व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. डॉ. तुषार अनिल भोजकर यांनी भूषविले. मा. श्री. विरेंद्र रुग्गे, मा. सौ. अर्चना माळी या कार्यक्रमात प्रमुख उपस्थित होते. सायंकाळी "मतदार राजा जागा हो " या विषयावर स्वयंसेवकांनी तळंदगे गावातील चौकातून, महत्त्वाच्या बाजारपेठ अशा ठिकाणी प्रबोधनात्मक पथनाट्य सादरीकरण केले.
- **गुरुवार दि. १२ जानेवारी २०२३** : रोजी जगन्नाथ मंदिर परिसरातील राहिलेले तलाव स्वच्छतेचे काम पूर्ण करण्यात आले तसेच शाहू नगर, बेघर वसाहत, संभाजी नगर अशा माळभागावरील परिसराची स्वच्छता स्वयंसेवकांनी केली. प्रबोधनात्मक कार्यक्रमात प्रा. बी. बी. जाधव यांचे "समाजसुधारक गाडगे महाराज" या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. सौ. सुनिता शिरहट्ट (तळंदगे) यांनी भूषविले तर मा. श्री. प्रमोद वाघमोडे, मा. सौ. संध्या कांबळे या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित होते. यावेळी प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याचे उद्‌घाटन नूतन सरपंच मा. संदीप पोळ यांनी केले. यावेळी स्वयंसेवकांनी प्रबोधनात्मक विविध कला प्रकार सादर केले.

- **शुक्रवार दि. १३ जानेवारी २०२३** : रोजी प्राथमिक मराठी कुमार व कन्या शाळा परिसर, मैदान स्वच्छता, अंगणवाडी परिसर स्वच्छता, सार्वजनिक पाण्याची टाकी व परिसर स्वच्छता, आखाडा परिसर स्वच्छता करण्यात आली. शिबीराचा शेवटचा दिवस असल्याने समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रा. डॉ. विलास सोयम (उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) तर अध्यक्ष म्हणून मा. प्रा. डॉ. कैलास सोनवणे (विभागप्रमुख, जैवरसायनशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) हे लाभले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. भोसले, सरपंच मा. श्री. संदिप पोळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

याशिवाय शिबीरार्थी स्वयंसेवकांनी १०० पानी वह्या व पेनचे संकलन करून मराठी कुमार व कन्या शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींना त्याचे वाटप केले. तसेच शाळा परिसरात वृक्षारोपनाचा कार्यक्रमही राबविण्यात आला. अशाप्रकारे विविध उपक्रमाचे आयोजन या शिबीरात करण्यात आले. या विशेष श्रमसंस्कार शिबीरास महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. भोसले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील सदस्य प्रा. श्रीमती जे. एल. बनसोडे, प्रा. बी. बी. जाधव, प्रा. के. आय. मुल्लाणी, प्रा. डी. सी. तुळशीकट्टी, प्रा. एम. एल. सोनटक्के, तसेच सर्व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचे सहकार्य या शिबीरास मिळाले. दत्तक गाव तळंदगे येथील सरपंच मा. श्री. संदिप पोळ, ग्रामविकास अधिकारी मा. श्री. एम. पी. कांबळे, श्री. धैर्यशील चौगुले, श्री. अविनाश शिंगारे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालयीन सेवक, तळंदगे येथील तरुण मंडळे, विकास सेवा सोसायटी, दुध संस्था, क्रिडा व शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक मंडळे, महिला बचत गट व सर्व ग्रामस्थ यांचे अनमोल सहकार्य मिळाले. महाविद्यालयातील सर्व आजी-माजी विद्यार्थी व शिबीरातील सर्व सहभागी स्वयंसेवकांचे मौल्यवान सहकार्याने हे शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाले.

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२२-२३

**ठिकाण : दत्तक गाव मौजे तळंदगे** **कालावधी : दि.७/१/२०२३ ते १३/१/२०२३**




शिबीराचे उद्घाटक मा. डॉ. अलोक जत्राटकर (जनसंपर्क अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर).

दि. १० जानेवारी २०२३ रोजी प्रसिध्द झालेली बातमी.

दैनिक द वाळवा क्रांती



चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेजच्या मौजे तळंदगे येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अलोक जत्राटकर , सरपंच संदिप पोळ

### संविधानातील मूल्ये जपत सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यासाठी तरूणांनी कटिबद्ध राहावे : अलोक जत्राटकर

**दै. वाळवा क्रांती \ रेंदाळ**

आजच्या काळात सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता व बंधुतेची जोपासना करणे गरजेचे बनले आहे त्यामुळे तरुणांनी संविधानातील मूल्ये जपत सामाजिक व राष्ट्रीय ऐकण्यासाठी कटिबद्ध राहावे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांनी केले.ते रयत शिक्षण संस्थेच्या, चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेजच्या मौजे तळंदगे येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन लोकनियुक्त सरपंच संदिप पोळ हे होते.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चंदनशिवे, माजी उपसरपंच कृष्णाजी मसुरकर मोहन भंडारे, भोजकर सर इत्यादी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ. संध्या माने यांनी केले. आभार प्रा. बाळकृष्ण जाधव यांनी मानले.

Sangli Edition
Jan 10, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

## प्रबोधनपर कार्यक्रम







मा.श्री. पंडित चोपडे – विषय : राष्ट्रीय सेवा योजना आणि आजचा युवक

मा. श्री. कृष्णात स्वाती – विषय : अधंश्रध्दा निर्मूलन : काळाची गरज

## समारोप कार्यक्रम






प्रमुख पाहुणे मा.प्रा. डॉ. विलास सोयम
(उपकुलसचिव,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

अध्यक्ष मा. प्रा. डॉ. कैलास सोनवणे
(विभाग प्रमुख,जैवरसायनशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

मौजे तळंदगे येथे मतदार जनजागृती फेरी – ‘मतदार राजा जागा हो !’






मौजे तळंदगे येथे विविध ठिकाणी ‘मतदार राजा जागा हो’ या विषयावर पथनाट्य सादरीकरण.





मौजे तळंदगे — कुमार व कन्या शाळा परिसरामध्ये वृक्षारोपन कार्यक्रम.





मौजे तळंदगे येथे कुमार आणि कन्या शाळेतील विद्यार्थ्यांना स्वयंसेवकांनी स्व-संकलित केलेले वह्या वाटप करताना.



मौजे तळंदगे येथे शिबीर कालावधीमध्ये स्वयंसेवक ग्रामस्वच्छता करताना.













**शिबीरामध्ये प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये कला अविष्कार सादर करताना स्वयंसेवक.**






दि. १९ जानेवारी २०२३ — रोजी प्रसिध्द झालेली बातमी.

दैनिक द वाळवा क्रांती

# राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा आपल्या मन मेंदू आणि मनगटातून समाज परिवर्तन घडवून देशाचा विकास करु शकतो :विलास स्वयंम

**दै. वाळवा क्रांती \ रेंदाळ**

सेवा योजनेचा विद्यार्थी हा आपल्या मन मेंदू आणि मनगटातून समाज परिवर्तन घडवून देशाचा विकास करु शकतो असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव प्रा.डॉ.विलास स्वयंम यांनी केले ते रयत शिक्षण संस्थेच्या चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयाच्या मौजे तळंदगे येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे जैवरसायन शास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.कैलास सोनवणे हे होते. तळंदगे गावाचे लोकनियुक्त सरपंच संदीप पोळ , महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डी. आर. भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.



**राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना प्रा.विलास स्वयंम , प्रा.कैलास सोनवणे , सरपंच संदिप पोळ**

शिवाजी विद्यापीठाचे जैवरसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.कैलास सोनवणे म्हणाले , आजच्या युवकांनी श्रमसंस्कार न विसरता स्वतः चे व्यक्तीमत्व त्यामधून विकसित करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

या शिबिरामध्ये विविध तज्ञ मान्यवरांची प्रबोधनपर व्याख्याने, ग्राम स्वच्छता, रस्ते सफाई, वृक्षारोपण, मतदार राजा जागा हो' या संदर्भातील रॅली, पथनाट्य तसेच 'अवयव दान श्रेष्ठ दान' याविषयी शॉर्ट फिल्म, महिला आरोग्य शिबिर आणि कुमार व कन्या शाळा तळंदगे येथील लहान विद्यार्थ्यांना शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या वह्याचे वाटप, प्रबोधनात्मक सांस्कृतिकपर कार्यक्रम असे विविध उपक्रम घेण्यात आले.

या शिबिरास श्रीमती जे.एल. बनसोडे, प्रा. के. आय. मुल्लाणी प्रा.डी.सी.तुळशीकट्टी ,प्रा.एम.एल. सोनटक्के आदिसह ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, गावातील प्रतिष्ठित नागरिक , शिबिरार्थी विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या शिबिरास धैर्यशील चौगुले,आकाश बिराजे, मुबारक कोथळी यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिराचे संयोजन प्रा. डॉ. श्रीमती एस.जे माने व प्रा. डॉ. आय. एच. मुल्ला यांनी केले. समारोप कार्यक्रमाचे आभार प्रा. बाळकृष्ण जाधव यांनी मानले.

Sangli Edition
Jan 19, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com